# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे - ०१
Website : www.mscepune.in Email : mscescholarship@gmail.com दूरध्वनी क्र. ०२०-२६१२३०६६/६७

**महत्त्वाचे**

जा.क्र. मरापप/शिष्यवृत्ती/२०१९/३४९०
दिनांक :- १५/०५/२०१९

प्रति,

मा. महासंचालक
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
तळमजला, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**विषय :- पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) दि. २४ फेब्रु. २०१९ च्या अंतरिम (तात्पुरता) निकालाच्या प्रसिद्धी निवेदनाबाबत...**

**महोदय,**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक २४ फेब्रुवारी,. २०१९ रोजी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी), शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) चा अंतरिम (तात्पुरता) निकाल गुरूवार, दि. १६ मे, २०१९ रोजी दुपारी ०३.०० वाजता www.mscepune.in व https://puppss.mscescholarshipexam.in या परिषदेच्या संकेतस्थळावर पाहता येईल. त्याबाबतचे प्रसिद्धीपत्रक सोबत जोडले आहे. कृपया सदरहू निवेदनास राज्यातील प्रमुख वर्तमानपत्रातून, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रावरुन विनामूल्य प्रसिद्धी द्यावी अशी आपणास विनंती आहे.

**सोबत** - प्रसिद्धीपत्रक

**आपला विश्वासू,**

(तुकाराम सुपे)
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०१.**

प्रत माहितीसाठी सादर

१. मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे १.
३. मा. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१.
४. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१.
५. श्रीमती नेहा हुमरसकर, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

१. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद, सर्व
३. शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (पश्चिम / दक्षिण / उत्तर).
४. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे.

# प्रसिद्धीपत्रक

## महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

**पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) दि. २४ फेब्रु. २०१९**

## अंतरिम निकाल

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक २४ फेब्रुवारी, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी), शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) चा अंतरिम (तात्पुरता) निकाल गुरूवार, दि. १६ मे, २०१९ रोजी दुपारी ०३.०० वाजता www.mscepune.in व https://puppss.mscescholarshipexam.in या परिषदेच्या संकेतस्थळावर घोषित करण्यात येत आहे. शाळांना आपल्या विद्यार्थ्यांचा निकाल त्यांच्या लॉगीनमधून तसेच पालकांना आपल्या पाल्यांचा निकाल संकेतस्थळावर पाहता येईल.

विद्यार्थ्यांना गुणपडताळणी करुन घ्यावयाची असल्यास संबंधित शाळांच्या लॉगीनमध्ये दि. १६ मे, २०१९ ते २७ मे, २०१९ या कालावधीत ऑनलाईन अर्ज उपलब्ध करुन देण्यात येत आहे. गुणांच्या पडताळणीसाठी प्रत्येक पेपरकरीता रु. ५०/- याप्रमाणे शुल्काची रक्कम ऑनलाईन पेमेंटद्वारे भरणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्याचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, शहरी / ग्रामीण, अभ्यासक्रम इत्यादीमध्ये दुरूस्तीसाठी दि. २७/०५/२०१९ पर्यंत संबंधित शाळेच्या लॉगीनमध्ये ऑनलाईन अर्ज उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सदर अर्ज ऑनलाईन व्यतिरिक्त अन्य कोणत्याही पध्दतीने पाठविल्यास स्वीकारले जाणार नाहीत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

विहित मुदतीत आवश्यक शुल्कासह ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जानुसार गुणपडताळणीचा निर्णय संबंधित शाळेच्या लॉगीनमध्ये अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांपर्यंत कळविण्यात येईल. विहित मुदतीत ऑनलाईन आलेले गुणपडताळणी अर्ज निकाली काढल्यानंतर अंतिम निकाल व गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाईल.

(तुकाराम सुपे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०१.

ठिकाण - पुणे
दिनांक - १५/०५/२०१९

E:\KUNAL\2019\result pressnote.docx